९८

# महाराष्ट्र शासन
# GOVERNMENT OF MAHARASHTRA

क्रमांक सीबीसी-१०९६/सी-१२५८/प्र.क्र. २३८/मावक-५
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
Social Welfare, Cultural Affairs and
Sports Department.
Mantralaya Annexe, Mumbai 400 032.
दिनांक ५ ऑक्टोबर १९९६.

प्रति,

सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

**विषय.**—दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे काही जातींचा विशेष प्रवर्गात समावेश करून त्यांना सवलती देणेबाबत.

**संदर्भ.**—आपले पत्र क्र. एसईसी/एमएनसी-११९६/प्र. क्र. १९६/का-३, दिनांक २४ सप्टेंबर १९९६.

महोदय,

आपण दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जातींच्या संदर्भात जी विचारणा केलेली आहे त्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, विशेष मागास प्रवर्गात समावेश असलेल्या जातीचा समावेश "नागरिकाचा मागास प्रवर्ग" या प्रवर्गामध्ये समावेश होत आहे. केवळ त्यांना विशेष सवलती शासनाने जाहिर केलेल्या आहेत. विशेष मागास प्रवर्गातील काही जाती यापूर्वी इतर मागासप्रवर्गामध्ये समाविष्ट होत्या त्यांचा समावेश विशेष मागास प्रवर्गात झाल्यामुळे इतर मागास प्रवर्गाच्या यादीतून त्या वगळण्यात आल्या. (शासन निर्णयाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत) काही जाती प्रथमच विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या आहेत. असे जरी असले तरी त्यांचा समावेश नागरिकाचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ज्यांचा समावेश करण्यात आलेला आहे त्यामध्ये विशेष मागास प्रवर्गाचा समावेश अंतर्भूत राहील.

आपला,

सही/–
(स. नु. गावीत)
शासनाचे अवर सचिव.

फॅक्स

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक एसईसी/एमएमसी-११९६/प्र. क्र. १९६/का-३,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ ऑक्टोबर १९९६.

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)

**विषय.**––महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुका १९९६-९७.
नागरिकांच्या मागासवर्गात विशेष मागासवर्गाचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम २ (१९) मध्ये नागरिकांचा मागासवर्ग (BACKWARD CLASS OF CITIZENS) या प्रवर्गाची व्याख्या देण्यात आली असून त्यामध्ये राज्य शासनाने वेळोवेळी इतर मागासवर्ग, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती म्हणून जाहीर केलेल्या जातींचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. शासनाच्या समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५ अन्वये इतर मागासवर्गांतील काही जाती व काही अन्य जाती याचा समावेश करून विशेष मागास प्रवर्ग निर्माण करण्यात आला असून सदर वर्गास काही अधिक सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दिनांक २४ ऑगस्ट १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जाती इतर मागासवर्गीयांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गात विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश होतो किंवा कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे, व त्याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच अन्य नागरिकांकडून व मागासवर्गीयांच्या काही संघटनांकडून स्पष्टीकरण करण्याची मागणी राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी समाजकल्याण विभागाकडून त्यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर १९९६ च्या पत्राद्वारे खुलासा प्राप्त झाला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :––

२. विषयाधीन निवडणुकांच्या संदर्भात नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गामध्ये राज्य शासनाने इतर मागासवर्ग म्हणून जाहीर केलेल्या जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचेसह विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जातींचाही समावेश होत असून सदर प्रवर्गातील नागरिक विषयाधीन निवडणुकीच्या प्रयोजनासाठी नागरिकांच्या मागासवर्गातून निवडणूक लढवू शकतील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

**सु. ग. नागवेकर,**
विशेष कार्य अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.